**दैनिक रजि. नं. /२०२६**

**दाखल ता. 0 /०५/२०२६**

क्रिमीनल किरकोळ अर्ज 57 / २०२६

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल

**यांचे कोर्टात...**

| | |
|---|---|
| **श्री. तेजपाल युवराज कांबळे**<br>व.व.२८, धंदा – नोकरी,<br>रा. पुष्पनगर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | **अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>**मुरगुड पोलिस स्टेशन** | **वि.प.** |

Order
A.P.P. and I.O. to say

J.M.F.C.
25.05.2026

**भारतीय नागरीक न्याय संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे जप्त मुद्देमाल मिळणेसाठी अर्ज**
**मुरगुड पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३४/२०२६**
**गुन्हा – भारतीय न्याय संहिता ३०८(२), ३०८(५), ३०८(६), ३०८(७), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे**

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.25 17:49:14 +0530

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

**<u>यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज कि</u>,**

यातील अर्जदार यांचे विरूध्द मुरगुड पोलिस ठाणे येथे दि. २२/०२/२०२६ इ.रोजी गु.र.नं. ३४/२०२६ हा दाखल झालेला आहे. सदरच्या गुन्हयामध्ये अर्जदार यांचा मोबाईल तपासी अधिकारी यांनी जप्त केलेला आहे. सदरचा मोबाईल हा अर्जदार यांचा दैनंदिन वापरातील आहे. त्यामुळे तो परत मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. यातील अर्जदार यांना तपासी अधिकारी यांनी अटक करून मे. कोर्टामध्ये हजर केलेले होते. मे. कोर्ट साहेबांनी अर्जदार यांना दि. ०४/०३/२०२६ इ.रोजी रोजीपर्यत पोलिस कस्टडी मंजूर केलेली होती. त्यादरम्यान तपासी अधिकारी यांनी अर्जदार यांच्या मोबाईल व त्यांचे सीमकार्ड फॉरेन्सीक लॅबोरेटरीकडे पाठवुन संपर्क सी.डी. आर (कॉल डिटेल्स रिपोर्ट) मिळविलेला आहे. संपुर्णपणे रिकव्हरी अर्जदार यांचेकडून केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांचा मोबाइल तपासी अधिकारी यांच्या ताब्यामधून अर्जदार यांच्या ताब्यामध्ये मिळणे आवश्यक आहे.

यातील अर्जदार यांनी स्वत:चे मालकीचा असणारा मोबाईल मिळणे करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे—

| अ.क्रं | तपशिल | अंदाजे किंमत |
|---|---|---|
| १ | VIVO कंपनीचा B V40e<br>कलर— ब्राऊन कलर<br>IMEI 1- 865260079018317<br>IMEI 2- 865260079018309 | २५,०००/— |

Bpasi
Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

| | | |
|---|---|---|
| | एकूण | २५,०००/— |

वर नमुद केलेला मुद्देमाल हे अर्जदार यांच्या मालकीचा असून त्यांच्या दैनंदिन वापरातील आहे व तो अर्जदार यांना बॉन्डवर परत मिळावा यासी कारणे खालीलप्रमाणे —

१) सदरचा जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा पोलिस ठाणेत पडून राहिलेस सदर मुद्देमालाचे नैसर्गिक आपत्ती पासून नुकसान होणार आहे.

२) सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा यातील अर्जदार यांना त्यांचे घरगुती व दैनंदिन वापरासाठी जरूरीचे असलेने याकामी अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे सदर मोबाईल ताबा मिळणे आवश्यक व गरजेचे आहे.

३) सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा अर्जदार यांना बॉन्डवर ताबेत दिलेस त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही किंवा त्यांची विक्री अगर तबदील करणार नाही.

४) सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा बॉन्डवर ताबेत दिलेस अर्जदार हे मे. कोर्ट आदेश करतील त्यावेळी अर्जदार हे मे. कोर्टात हजर करणेस तयार आहोत.

५) सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेटच्या मालकीशी अन्य इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क नाही.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

६) सदरहु जप्त मुददेमाल बॉन्डवर ताबेत दिलेस अर्जदार हे मे. कोर्टाच्या अटी व शर्तीचे पालन करणेस तयार आहेत.

७) यातील तपासी अधिकारी यांनी मोबाईल व त्यावरून केलेले फोन, मेसेज, व्हाईस रेकॉर्डीग हे संपुर्ण पणे जप्त केलेले आहे. जप्त मुद्देमालाबाबत संपुर्ण तपासणी झालेने सदरचा मोबाईल अर्जदार यांचे ताब्यात देणेबाबत आदेश व्हावा.

८) **सबब विनंती कि**,

अ) सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा अर्जदार यांना मे. कोर्टानी बॉन्डवर ताबेत देणेविषयी हुकूम व्हावा ही नम्र विनंती

ब) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी मिळावी.

क) न्यायाचे अनुषंगिक हुकूम याच कामी अर्जदार यांचे बाजुने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असे. मे.जा. व्हावे

कागल

दि. ०२/०५/२०२६

अर्जदार

# ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार श्री. तेजपाल युवराज कांबळे व.व.२८, धंदा – नोकरी, रा. पुष्पनगर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर शपथेवर

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

ॲफिडेव्हीट करतो कि, वर नमुद अर्जातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू जप्त मुद्देमाल VIVO कंपनीचा V40e मोबाईल हॅडसेट हा माझ्याच मालकीचा आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट कागल

ता. 08/०५/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो ॲफिडेव्हीट करणार

ॲड. प्रणिल पी. कालेकर

# प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार श्री. तेजपाल युवराज कांबळे व.व.२८, धंदा – नोकरी, रा. पुष्पनगर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कि, वर नमुद अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा

कागल

ता. 08/०५/२०२६

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri...Tejpal Yuvraj Kamble
Age 28 of Bhudargad.....who is
identified by Shri....P.P. Kalekar Adv
.............whom I know personally
Dated :- 8/5/26

Assistant Superintendent